# लोकप्रबोधनकार
# अण्णा भाऊ साठे

संपादक
डॉ. रामशेट्टी शेटकार
प्रा. बालाजी शिंदे



डॉ. विद्या कांबळे मॅडम आपणास सस्नेह सप्रेम भेट.

३२/०९/2023

# लोकप्रबोधनकार अण्णा भाऊ साठे


: संपादक :

डॉ. रामशेट्टी शेटकार

प्रा. बालाजी शिंदे



प्रभाकर पब्लिकेशन

३०४, सिद्धीविनायक अपार्टमेंट,

सुतमील रोड, लातूर मो. ८६००८८११२७

**Lokprabodhankar Anna Bhau Sathe**
**Editor : Dr. Ramshetti Shetkar,**
**Prof. Balaji Shinde**

**लोकप्रबोधनकार अण्णा भाऊ साठे**
**संपादक : डॉ. रामशेट्टी शेटकार,**
**प्रा. बालाजी शिंदे**

**Paper Back**
**ISBN 978-81-945948-2-6**
**E-Book**
**ISBN 978-81-945948-3-3**

**प्रभाकर पब्लिकेशन**
३०४, विंग-सी, सिद्धीविनायक अपार्टमेंट,
सुतमील रोड, लातूर
मो. ८६००८८११२७, ८१४९१५३०१८

© सर्व हक्क
**संपादकाधीन**

प्रथमावृत्ती
**१ जानेवारी २०२१**
**(अण्णा भाऊ साठे जन्मशताब्दीनिमित्त)**

मुद्रक
**आर्टी ऑफसेट, लातूर**

अक्षर जुळवणी
**रोहित टायपिंग सेंटर, लातूर**

मुखपृष्ठ रेखाटन
**शिवाजी हांडे**

**₹ - ३६०/-**

*सूचना : या पुस्तकातील कोणत्याही भागाचे पुनर्निर्माण अथवा वापर इलेक्ट्रॉनिक अथवा यांत्रिकी साधनांनी - फोटोकॉपिंग, रेकॉर्डिंग किंवा कोणत्याही प्रकारे माहिती साठवणुकीच्या तंत्रज्ञानातून प्रकाशकाच्या व संपादकाच्या लेखी परवानगीशिवाय करता येणार नाही. सर्व हक्क राखून ठेवले आहेत. या ग्रंथातील लेखकांच्या मताशी संपादक, प्रकाशक, मुद्रक, वितरक सहमत असतीलच असे नाही.

४४. **अण्णा भाऊ साठे यांची शाहिरी आणि लोकनाट्य / २६५**
डॉ. गजेंद्र रंदील

**भाग - ११**
**अण्णा भाऊ साठे यांची लोकनाट्य**

४५. **अण्णा भाऊ साठे यांची लोकप्रबोधनकारी लोकनाट्य / २७१**
डॉ. सुदाम पवार

४६. **लोकनाट्याचे जनक : अण्णा भाऊ साठे / २७७**
प्रा. वसंत बंडे

**भाग - १२**
**प्रवासवर्णन : 'माझा रशियाचा प्रवास'**

४७. **प्रतिभावंत साहित्यिकाचा प्रवास : 'माझा रशियाचा प्रवास' / २८७**
डॉ. वंदना शिंदे

४८. **'माणूस' शोधाचा प्रवास : 'माझा रशियाचा प्रवास' / ३००**
प्रा. धनंजय भाट

**भाग - १३**
**अण्णा भाऊ साठे यांची कादंबरी व चित्रपटनिर्मिती**

४९. **'अलगुज' : कादंबरी ते चित्रपट / ३०५**
डॉ. गोविंद काळे

**भाग - १४**
**अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्याचे वाङ्मयीन मूल्य**

५०. **लोकराज्याचे पुरस्कर्ते : अण्णा भाऊ साठे / ३१५**
प्रा. रश्मी देसाई

५१. **अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातील मूल्ये / ३२४**
डॉ. संग्राम टेकले

५२. **अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्याची लेखनशैली / ३३०**
प्रा. संतोष कांबळे

५३. **अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यलेखनाचे वेगळेपण / ३३३**
डॉ. विद्यादेवी कांबळे

# ५३.

# अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यलेखनाचे वेगळेपण

डॉ. विद्यादेवी कांबळे

साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांनी मराठी साहित्याचे दालन समृद्ध केले असून ते ठ साहित्यिक म्हणूनच नव्हे तर कलावंत म्हणूनही जगाला परिचित आहेत. याशिवाय त्यसृष्टीतील त्यांचे अनमोल कार्य आणि वेगवेगळ्या विषयाला न्याय देऊन समाजातील क प्रश्नांना हात घालणारे समाजसुधारक म्हणूनही ते परिचित आहेत.

तुकाराम भाऊराव साठे यांचा जन्म १ ऑगस्ट १९२० रोजी वाटेगाव येथे वडील राव, आई वालुबाई यांच्या पोटी झाला.फक्त दीड दिवसाच्या शाळेच्या अनुभवातून भरातील समाजाला शिकविणारे अण्णा भाऊ एक उत्तम समाजसुधारक झाले. भाऊभावंडं या समवेत आपल्या जीवनप्रवासात हलाखीच्या परिस्थितीतून जगण्याचे धडे घेतले आणि साहित्यातून मांडले. कामगार, मजूर, बुटपॉलिश यासारखी सर्व हलकी कामं करून जातीयतेच्या वळदंडात अडकलेल्या समाजाला बाहेर काढण्याचा प्रयत्न केला. गावकुसाबाहेरील तसेच तत्व वाट्याला आलेल्या लोकांना 'स्व' ची जाणीव करून दिली. परिवर्तनाचा ध्यास घेतला. बरोबर त्यांच्यावर साम्यवादाचा प्रभाव होता, तसाच आंबेडकरवादी विचारांचाही प्रभाव ा. त्यांनी नाटक, लोकनाट्य, कथासंग्रह, कादंबऱ्या, प्रवासवर्णन इत्यादी लोकोपयोगी हेत्यप्रकारातून विपुल लेखन केले.

अण्णा भाऊ साठे यांची कादंबरी समाजाचा जीवनपट उलगडून दाखवते, जगण्यातलं त्तव सांगते आणि मानवतावाद शिकवते. त्यांच्या सात कादंबऱ्यांवर मराठी चित्रपटही र्माण झालेली आहेत. ज्यात 'टिळा लाविते मी रक्ताचा', 'अशी ही साताऱ्याची तऱ्हा', 'मुरळी हारी रायाची', 'फकिरा', 'डोंगराची मैना', 'वैजयंता', 'वारणेचा वाघ' इ. चित्रपटांचा समावेश ो. अण्णा भाऊ साठे यांची कादंबरी समाजातील अनेक स्तर उलगडून त्यावर भाष्य करते णि समाजातील वृत्तीचेही चित्रण करते. तसेच त्यांचे कथाविश्व सर्वसामान्य माणसाचे वन वाचकांच्या समोर आणते. जगण्यासाठी लढणाऱ्या माणसाचे जीवन उलगडून दाखवणारी ांची कथा आहे. त्यांनी नाटक, लोकनाट्य, प्रवासवर्णन आणि शाहिरी लेखनही केले आहे. माजातील व्यक्तीच्या विचाराला प्रवाहित करण्यासाठी त्यांची लेखणी अहोरात्र झगडत होती, व्यत होती. म्हणून ते म्हणतात, 'तू गुलाम नाहीस तर तू या वास्तव जगाचा निर्माता आहेस.'

गुलामीचं जगणं अण्णा भाऊंना मान्य नव्हतं. क्रांतिकारी जाणिवेतून भटकंती करणारा माणूस त्यांच्या साहित्यात येतो. परंतु मान खाली घालून परिस्थितीच्या समोर झुकणारा माणूस त्यांच्या साहित्यात दिसत नाही. त्यांनी समाजात जागृती निर्माण केली, समाजपरिवर्तनाचा ध्यास घेतला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा प्रभाव त्यांच्यावर होता, म्हणून त्यांनी 'जग बदल घालुनी घाव सांगून गेले मज भीमराव' असे उद्‌गार काढून दलित चळवळीला नावारूपाला आणण्याचे कार्य केले. याशिवाय दलित चळवळ अजून प्रखर बनवण्याचे महत्त्वाचे कार्य अण्णा भाऊ साठे यांच्या लेखणीने केले. ते म्हणतात, ' ही पृथ्वी शेषाच्या मस्तकावर तरली नसून ती दलितांच्या तळहातावर तरली आहे' अशी क्रांतीची भाषा अण्णा भाऊ साठे यांची लेखणी करते.

'माझी मैना गावावर राहिली माझ्या जिवाची होतीया काहिली' या छक्कडमधून मुंबई नगरीचे चित्रण ते करतात. पोटाची खळगी भरण्यासाठी शरीराची विक्री करणाऱ्या स्त्रिया यांची आबाळ डोळ्यांना बघवत नाही. एकीकडे खोल दरी गरिबीची आणि एकीकडे चकाकणारी श्रीमंती याचेही चित्रण त्यांनी केले आहे.

अण्णा भाऊ साठे यांनी साहित्यातून क्रांती, सामाजिक विषमता ,शोषित, पीडित, दलित, कामगारं ,स्त्रियांचं जगणं, क्रांतिकारी नायक-नायिका, आर्थिक शोषण, सामाजिक, राजकीय दोष, वास्तववादी समाज, चांगल्या वाईट वृत्ती -प्रवृत्ती, सक्षम स्त्री नायिका, सर्व स्तरांचे प्रश्न, समस्या, अन्याय-अत्याचार, छळ, संघर्ष, वेदना, परिवर्तन या सर्व दृष्टिकोनातून लिखाण केलेले आहे, त्यांचे साहित्य समाज उपयोगी असून त्यांच्या साहित्यात 'माणूस' हा केंद्रबिंदू आहे. त्यामुळे त्यांच्या साहित्यातील जाणिवा ह्या विचाराला प्रवाहित करतात आणि समाजचिंतन करायला लावतात. अंधश्रद्धा, रूढी-परंपरा ,कर्मकांडाला भेदून वैज्ञानिक दृष्टिकोनही अण्णा भाऊ स्वीकारतात. परिवर्तनाचा ध्यास त्यांच्या स्मशानातील सोनं, बिलवरी, सावळा मांग, दुर्गा, डोळे, प्रायश्चित, पोलादी माणूस, थडग्यातील हाडं, जिवंत काडतूस, फकिरा, माकडीचा माळ या कथा व कादंबरीतून दिसतो. आवडी, कोकिळा, पिला, रम्मी, आबी, फुला, रत्ना, चित्रा, वैजयंता, सोना, गीता, रंगू ,मंकी इत्यादी कादंबरी नायिकांच्या माध्यमातून मानवमुक्तीचा संदेशही त्यांनी दिला आहे. माणसाचे माणूसपण आणि त्यांचा मोठेपणा नाकारणाऱ्या व्यवस्थेला चपराक देण्याचे काम अण्णा भाऊ साठे यांनी केले आहे.

अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातून आलेले क्रांतिकारी विचार एका क्रांतिकारी साहित्यकाराची ओळख करून देते, जी माणसाला जगायला शिकवते. म्हणून सर्वसामान्य माणसांच्या वेदनेला मुखर करणारी अण्णा भाऊ साठे यांची लेखणी जगभरातून साहित्यसृष्टीत वेगळा ठसा उमटवणारी आहे.

अण्णा भाऊंच्या साहित्यातील क्रांतीचा विचार, समानतेचा हक्क, जाणीव जागृती, स्वतंत्र विचाराची स्त्री आणि क्रांतिकारी नायक, नायिका जगण्यासाठी आदर्श अशा आहेत.

**अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्याचे वेगळेपण :**

१. अण्णा भाऊ साठे यांचे साहित्य स्त्रियांचे आत्मभान जागवणारे साहित्यलेखन आहे.
२. अण्णांनी कल्पनारम्यतेपेक्षा वास्तववादी साहित्यलेखन केले.
३. मार्क्सवाद, आंबेडकरवाद, मानवतावाद, कम्युनिस्ट विचारधारा हा त्यांच्या साहित्यलेखनाचा मूलाधार आहे.
४. अण्णा भाऊंनी जे जीवन जगले, त्या जीवनाची वास्तव जीवनानुभूती त्यांच्या साहित्यलेखनात आहे.
५. जगण्यासाठी लढणारी माणसं, नायक-नायिका हे त्यांच्या साहित्यलेखनाचा केंद्रबिंदू होता.
६. अण्णा भाऊंनी आपल्या साहित्यलेखनातून लोकप्रबोधन, समाजजागृतीही केलेली आहे.
७. परंपराविरुद्ध परिवर्तनवादी विचारांचे बीजारोपण आपल्या साहित्यलेखनातून त्यांनी केले आहे.
८. अण्णांनी साहित्यातून क्रांतीचा, समतेचा विचार मांडलेला आहे.
९. सर्वसामान्यांना 'स्व' ची जाणीव आपल्या साहित्यातून त्यांनी करून दिली आहे.
१०. जातीव्यवस्था, वर्णव्यवस्था व अस्पृश्यता याविरुद्ध त्यांनी आवाज उठविला. कामगार चळवळ दृढ केली. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत त्यांचे मोलाचे योगदान आहे.

**संदर्भ सूची :**


१. डॉ. मस्के राजकुमार, डॉ. लहू वाघमारे (संपादक) : 'अण्णा भाऊ साठे : व्यक्ती, साहित्य आणि समीक्षा', युगप्रवर्तक प्रकाशन, लातूर, प्रथमावृत्ती - १४ एप्रिल २०१९.
२. गुरव बाबुराव : 'अण्णा भाऊ साठे विचार आणि साहित्य विवेचन', लोकवाङ्मय गृह, मुंबई, २०१०.
३. कोरडे बजरंग : 'अण्णा भाऊ साठे', साहित्य अकादमी, नवी दिल्ली, २००१.
४. डॉ. गारोडे प्रमोद : 'अण्णा भाऊंचे कादंबरीविश्व', कमल प्रकाशन, अमरनाथ प्रकाशन, ठाणे.


❖❖❖

४०. डॉ. व्यंकटी पावडे

के.आर.एम.महिला महाविद्यालय, नांदेड.

४१. प्रा. बालाजी नारायण शिंदे

सरस्वती संगीत कला महाविद्यालय, लातूर, ता. जि. लातूर

४२. प्रा. श्रीकांत मुद्दे

लातूर.

४३. प्रा. वैभव नानासाहेब कांबळे

श्रीमती विजयादेवी देसाई सिनियर कॉलेज, दौलतनगर, ता. पाटण, जि. सातारा

४४. डॉ. गजेंद्र रंदील

शि. गु. रा. गे. शिंदे महाविद्यालय, परंडा ता. परंडा, जि. उस्मानाबाद

४५. डॉ. सुदाम वसंतराव पवार

सरस्वती संगीत कला महाविद्यालय, लातूर

४६. प्रा. वसंत बंडे

सरस्वती संगीत कला महाविद्यालय, लातूर, ता. जि. लातूर

४७. डॉ. वंदना शिंदे

कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालय, खारेपाटण, ता.कणकवली, जि.सिंधुदुर्ग

४८. डॉ. गोविंद काळे

स्वामी विवेकानंद महाविद्यालय, शिरुर ताजबंद, ता. अहमदपूर, जि. लातूर.

४९. प्रा. धनंजय वसंत भाट

कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, पलूस, जिल्हा सांगली.

५०. प्रा.रश्मी रमेश देसाई

कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, खारेपाटण, ता. कणकवली, जि.सिंधुदुर्ग

५१. डॉ. संग्राम टेकले

श्रीमती सुशीलादेवी देशमुख महिला महाविद्यालय, लातूर

५२. प्रा. संतोष कांबळे

डी.एस.एम.कॉलजे, परभणी

५३. डॉ. विद्यादेवी मनोहर कांबळे

गोविंदलाल कन्हैयालाल जोशी (रात्रीचे) वाणिज्य महाविद्यालय, लातूर.

५४. विश्वनाथ साठे

मु.पो. शारा, ता.लोणार, जि. बुलढाणा

५५. डॉ. रामशेट्टी राजेंद्र शेटकार

मु.पो.नदीहत्तरगा, ता.निलंगा, जि.लातूर (दयानंद विज्ञान महाविद्यालय, लातूर)

५६. प्रा.श्रीमंत दोरवे

सरस्वती संगीत कला महाविद्यालय, लातूर, ता.जि.लातूर

५७. Mr. Bapshetti Shetkar

At.Post. Nadihattrga, Tq. Nilanga, Dist. Latur

५८. डॉ. शिवाजी कदम

शंकरराव जावळे, पाटील महाविद्यालय, लोहारा, ता.लोहारा, जि.उस्मानाबाद

५९. डॉ. गजानन हरिराम बने

दयानंद विज्ञान महाविद्यालय, लातूर

६०. डॉ. छाया कडेकर

शंकरराव जावळे पाटील महाविद्यालय, लोहारा, ता.लोहारा, जि.उस्मानाबाद.

❖❖❖

संपादक



डॉ. रामशेट्टी शेटकार



प्रा. बालाजी शिंदे

लोकशाहीर अण्णा भाऊ साठे वारणेच्या खोऱ्यात वाटेगावच्या परिसरातील दऱ्याखोऱ्यात वाढले. पोट भरण्यासाठी पायी चालत वडिलांबरोबर मुंबईला आले. तेथे साम्यवादी विचाराने भारावले. पुढे संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील लढ्यात शाहीर अमर शेख, शाहीर गव्हाणकर यांच्यासोबत 'लाल बावटा' कलापथकाच्या माध्यमातून क्रांतिकारी विचार मांडत सारा महाराष्ट्र ढवळून काढला. वर्गसंघर्षाचा लढा उभा करून प्रबोधन केले. समाजाला जागे करण्याचे काम केले. अण्णा भाऊ साठे समाजप्रबोधन करणारे उत्तुंग प्रतिभेचे लोकशाहीर होते. त्यांनी काव्य लिहिले. कथा, कादंबऱ्या लिहिल्या. लावण्या, पोवाडे, छक्कडी रचल्या. तमाशा लोकनाट्याची निर्मिती केली. समताधिष्ठित समाजरचना, वर्ग जातिअंत आणि मानवी प्रतिष्ठा हे त्यांचे स्वप्न होते व ते सत्यात यावे म्हणून आयुष्याच्या अखेरपर्यंत त्यांनी लोकजागृतीचे कार्य केले. त्यांची स्वत:ची एक राजकीय भूमिका होती. विषमता, अन्याय, सत्ताधारी, शेटजी यांच्याकडून गरिबांचे होणारे शोषण आणि त्याविरुद्धचा लढा अण्णा भाऊंनी साहित्यातून अधोरेखित केला. ग्रामीण, दलित, भटके, झोपडपट्टीतील माणसांचे जीवनानुभव, स्त्रियांची अगतिकता, त्यांचा जिद्दीपणा, जगण्याचा संघर्ष, त्यांची लढाऊवृत्ती, दारिद्र्याशी हार न मानता जगण्याची प्रवृत्ती अण्णा भाऊ साठे यांनी साहित्यातून मांडली. त्यांची माणसांच्या ठिकाणी असणाऱ्या अफाट [illegible] व मानव्यावर अदम्य श्रद्धा होती. कामकरी, कष्टकरी, गरिबांबद्दल [illegible] सहानुभूती होती. आंबेडकरी विचारांविषयी आत्मीयता होती आणि हे सारे त्यांच्या साहित्यात दिसते. त्यामुळे अण्णा भाऊ देश, काळ यांच्या भिंती ओलांडून पलीकडे गेले. म्हणून आज अण्णा भाऊ साठे प्रस्तुत ठरतात.

डॉ.रामशेट्टी शेटकार, प्रा.बालाजी शिंदे यांनी संपादित केलेल्या 'लोकप्रबोधनकार अण्णा भाऊ साठे' या ग्रंथात व्यासंगी लेखकांनी अण्णा भाऊ साठे यांच्या व्यक्तिमत्त्वावर आणि त्यांच्या साहित्यावर लोकप्रबोधनात्मक दृष्टिकोनातून प्रकाशझोत टाकला असल्याने हा ग्रंथ लक्षवेधक झाला आहे. हा ग्रंथ वर्तमान व भावी पिढीस अत्यंत दिशादर्शक, मार्गदर्शक असा आहे. अण्णा भाऊ साठे आणि उपेक्षित घटकांबद्दल कळवळा असणाऱ्या सर्व रसिक वाचकांनी प्रस्तुत ग्रंथाचे उत्स्फूर्त स्वागत करून प्रतिसाद द्यायला हवा, असा हा अजोड संपादित ग्रंथ आहे.

**डॉ. विश्वनाथ शिंदे**

महात्मा फुले अध्यासन प्रमुख

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.

प्रभाकर पब्लिकेशन

ISBN 978-81-945948-2-6

9 788194 594826

₹ 360/-

e Book available